| | | | |
|---|---|---|---|
| CNR NO.MHLA070004902023 | दाखल तारीख | : | ०४.०८.२०२३ |
| | नोंदणी तारीख | : | ०४.०८.२०२३ |
| | निकाल तारीख | : | १३.०३.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | | **०२ ०७ ०९** |

**भाग – अ**

| | | |
|---|---|---|
| **अतिरीक्त सत्र न्यायाधीश, उदगीर यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी श्री.डि.बी.म्हालटकर)**<br>**न्यायनिर्णय**<br>**निकाल दिनांक १३/०३/२०२६**<br>**सत्र खटला क्र.२८/२०२३**<br>**निशाणी क्र.४२** | | |
| **प्रथम खबर बाबत सविस्तर माहिती, गुन्हा आणि पोलीस ठाणे,** | | भारतीय दंड संहितेचे कलम ३५३, ३३२, ५०६.<br>पोलीस ठाणेः वाढवणा, ता. उदगीर |
| **तक्रारदार/अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन,**<br>सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, वाढवणा (बु.) ता.उदगीर, जि.लातूर |
| **अभियोगपक्षा करीता** | | श्री.एस.आय.बिराजदार |
| **आरोपी** | | पुंडलिक विश्वनाथ बिरादार,<br>वयः– ३८ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>रा.किनी (य.), ता.उदगीर जिल्हा लातूर |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | श्री. व्ही.एन.संकाये |

## न्यायनिर्णय

(खुल्या न्यायालयात घोषीत)

(निकाल दिनांक १३ मार्च २०२६)

प्रस्तुतचा खटला हा आरोपी विरूध्द त्याने भारतीय दंड संहितेचे कलम ३५३, ३३२, ५०६ अन्वये दंडनिय अपराधाकरीता दाखल करण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

०२. जखमी/फिर्यादी भाऊसाहेब दगडु कांबळे हा पशुधन पर्यवेक्षक म्हणुन पशुवैद्यकीय दवाखाना, किनी (य.), ता.उदगीर, जिल्हा लातूर येथे दिनांक ०१.०६.२०१८ पासुन कार्यरत आहे. दिनांक १८.०६.२०२२ रोजी तो त्याच्या किणी यल्लादेवी या कार्यालयात काम करत असताना आरोपी पुंडलिक विश्वनाथ बिरादार दुपारी ०१.०० च्या सुमारास त्याच्या दवाखान्यात आला. त्याने त्याची गाय/म्हैस हिचे कृत्रिम रेतन केल्याची तारीख विचारली. फिर्यादीने बाहय रुग्ण रजिस्टर पाहुन त्याला ती तारीख सांगितली असता आरोपीने ती तारीख चुकीची आहे असे सांगुन तुमच्या मनाने काहीही सांगता असे म्हणाला. त्यावर फिर्यादीने तो रजिस्टर पाहुन तारीख सांगत आहे असे सांगितले. त्यावर आरोपी त्याच्या घरी गेला व घरातुन काठी आणुन तुला दाखवतो असे म्हणुन ती काठी मानेवर मारली. तसेच त्याच्या पोटावर लाथा मारल्या. त्यावेळी आरोपीची पत्नी तेथे येवुन तिने सोडवासोडव केली व कमरेला धरुन त्याला घेवुन गेली. त्यामुळे फिर्यादीने वाढवणा पोलीस ठाण्यात जावुन दिनांक १८.०६.२०२२ रोजी फिर्याद दिली. त्या आधारे वाढवणा पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्र.१०१/२०२२ भारतीय दंड संहिता कलम ३५३, ३३२ व ५०६ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला.

०३. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक मुरारी गायकवाड यानी केला. तपासाच्या दरम्यान त्याला फिर्यादी यानी आरोपीला त्याची पत्नी घेवुन

जातानाचा मोबाईल फोनवरुन काढलेला फोटो व भारतीय पुराव्याचा कायदा कलम ६५–ब प्रमाणे दिलेले प्रमाणपत्र दिले. त्याने आरोपीला अटक केली व अटक पंचनामा केला. आरोपीने दिनांक २०.०६.२०२२ रोजी गुन्हयात वापरलेल्या काठी संदर्भात निवेदन दिले व त्याआधारे त्यानी काठी जप्त केली. तसेच घटनास्थळ पंचनामा केला. तसेच त्यानी फिर्यादीचे शर्ट पंचनामा करुन जप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळविले. तसेच फिर्यादीचे उपस्थिती बाबत हजेरी रजिस्टर मिळविले. घटनास्थळाचा ८–अ उतारा मिळविला. त्यानंतर पुरेसा पुरावा मिळुन आल्याने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उदगीर यानी भारतीय दंड संहितेचे कलम ३५३, ३३२ खालील गुन्हा हा सत्र न्यायालयाने संपरिक्षीत करावयाचा गुन्हा असल्याने सदर खटला सत्र न्यायालयात वर्ग केला.

०५. मी आरोपी विरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३५३, ३३२, ५०६ अन्वये खालील शिक्षापात्र कलमांतर्गत नि.क्र.१२ नुसार आरोप निश्चित केले. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन प्रकरणाची संपरिक्षा करण्याची मागणी केली. अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविणे संपल्यावर भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे आरोपीचा जबाब निशाणी ४१ वर नोंदविण्यात आला, त्याने त्याला खोटया प्रकरणात गोवल्याचा बचाव घेतला आहे. बचावाच्या पुष्टयर्थ त्यांनी बचावाचे साक्षीदार तपासले नाहीत.

०६. मी सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. न्यायालयासमोर आलेल्या मौखीक व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये त्याचा उल्लेख आवश्यकतेनुसार केला आहे.

०७. दोषारोपपत्र निश्चित केलेले दोषारोप व आलेला पुरावा या अनुषंगाने माझ्या समोर खालील नमुद मुद्दे उपस्थित झाले असून त्याबाबतचे कारणांसहीत निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | उत्तरे |
|---|---|---|
| १. | दिनांक १८.०६.२०२२ रोजी १५.०० वाजता पशुवैद्यकीय दवाखाना, किनी (य.) ता.उदगीर जिल्हा लातूर येथे आरोपीने फिर्यादी भाउसाहेब दगडु कांबळे या पशुधन पर्यवेक्षक या पदावर काम करत असलेल्या लोकसेवकास त्याने कर्तव्य बजावल्याच्या कृतीच्या परिणामी म्हणजेच आरोपीस त्याच्या पशुधनाच्या कृत्रिम रेतनाच्या तारखेची माहिती दिल्याच्या कारणावरुन त्याच्यावर हल्ला केला किंवा फौजदारी प्रत बळाचा वापर केला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| २. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी या लोकसेवकास त्याचे कर्तव्य बजावत असताना इच्छापुर्वक मारहाण करुन साधी दुखापत पोहोचवली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| ३. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस मारण्याची धमकी देवुन फौजदारी धाकदपटशा दाखविला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | आरोपीला दोषमुक्त करण्यात येते. |

<u>**कारणमीमांसा**</u>

०८. या कामी अभियोग पक्षातर्फे एकुण सहा साक्षीदार तपासलेले आहेत. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ पोलीस अधिकारी गौसमिया शादुल शेख

(नि.क्र. १७), साक्षीदार क्र.२ डॉ.हरेश्वर प्रल्हाद सुळे (नि.क्र. १९), साक्षीदार क्र.३ फिर्यादी भाउसाहेब दगडु कांबळे (नि.क्र. २२), साक्षीदार क्र.४ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सुदेशना विलास चौधरी (नि.क्र. २६), साक्षीदार क्र.५ पंच श्रीकांत उत्तम माने (नि.क्र. ३१), साक्षीदार क्र.६ तपासी अंमलदार मुरारी किसनराव गायकवाड (नि.क्र. ३६) यांना तपासले आहे. अभियोग पक्षाने फिर्याद, छायाचित्र (नि.क्र. पी–२५/सा.क्र.३), वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र. पी–२०/सा.क्र.२), घटनास्थळ पंचनामा (नि.क्र. पी–३२/सा.क्र.२), निवेदन पंचनामा (नि.क्र. पी–३३/सा.क्र.५), काठी जप्ती पंचनामा (नि.क्र. पी–३४/सा.क्र.५), फिर्यादीचे शर्ट जप्ती पंचनामा (नि.क्र. पी–३५/सा.क्र.५), अटक पंचनामा (नि.क्र. पी–३७/सा.क्र.६), उपअधिक्षक भुमिअभिलेख यांना पंचाकरीता दिलेले पत्र (नि.क्र. पी–३८/सा.क्र.६) व ८–अ उतारा (नि.क्र. पी–३९/सा.क्र.६) असा पुरावा दिला असुन मुद्येमाल काठी (मटेरियल ऑब्जेक्ट–१) व फिर्यादीचे शर्ट (मटेरियल ऑब्जेक्ट–२) अशा वस्तु हजर केल्या आहेत.

०९. अभियोग पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की फिर्यादीने आरोपी त्याच्या कार्यालयात आला होता हे कबुल केले आहे. तसेच आरोपीची व त्याची बाचाबाची झाली व त्याने शिवीगाळ केली हे कबुल केले आहे. वैद्यकीय अधिकारी यानी फिर्यादीस झालेल्या जखमा शाबीत केल्या आहेत. पंच साक्षीदार व पोलीस साक्षीदारानी घटनास्थळ पंचनामा, निवेदन पंचनामा व काठी जप्ती पंचनामा शाबीत केलेला आहे. त्यामुळे आरोपी विरुध्दचे आरोप शाबीत झाल्याने त्याला शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

१०. याउलट आरोपींतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की वर्दीदार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी घटना नाकारली आहे. वर्दिदार याने त्याला आरोपीने काठीने मारहाण केली ही बाब नाकारली आहे. फिर्यादीतील मजकुरही त्यानी नाकारला आहे. त्याचे कार्यालयात हजर असलेली प्रत्यक्षदर्शी साक्षीदार ही

देखील सदर घटना नाकारते. त्यामुळे आरोपीस दोषमुक्त करण्यात यावे अशी त्यानी विनंती केली आहे.

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीताः–</u>**

११. दिनांक १८.०६.२०२२ रोजी १५.०० वाजता पशुवैद्यकीय दवाखाना, किनी (य.) ता.उदगीर जिल्हा लातूर येथे आरोपीने फिर्यादी भाउसाहेब दगडु कांबळे या पशुधन पर्यवेक्षक या पदावर काम करत असलेल्या लोकसेवकास त्याने कर्तव्य बजावल्याच्या कृतीच्या परिणामी म्हणजेच आरोपीस त्याच्या पशुधनाच्या कृत्रिम रेतनाच्या तारखेची माहिती दिल्याच्या कारणावरुन त्याच्यावर हल्ला केला किंवा फौजदारी प्रत बळाचा वापर केला व त्याला इच्छापुर्वक दुखापत केली व मारण्याची धमकी दिली असा आरोप अभियोग पक्ष आरोपीवर करत आहे. सबब त्या अनुषंगाने झालेला पुरावा पडताळुन पाहणे आवश्यक आहे.

१२. या घटनेतील महत्वाचे साक्षीदार फिर्यादी भाउसाहेब दगडु कांबळे व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सुदेशना विलास चौधरी हे आहेत. फिर्यादी भाउसाहेब दगडु कांबळे यानी निशाणी २२ वरील जबानीत असे सांगितले आहे की, दिनांक १८.०६.२०२२ रोजी तो किणी यल्लादेवी येथे पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुधन पर्यवेक्षक म्हणुन कार्यरत असताना संगणकावर काम करीत होता. आरोपी दुपारी ०१.०० वा. त्याच्याकडे आला व ओ.पी.डी. मध्ये कृत्रिम रेतन केलेली गाईची नोंद दाखल असे म्हणाला. त्याने त्याला नोंद दाखविली. ती नोंद बरोबर नाही चुकीची आहे असे आरोपी म्हणाला. त्यावरुन त्यांच्यात बाचाबाची झाली व आरोपीने त्याला शिवीगाळ केली असे तो सांगतो. त्याने आरोपीनी त्याला मारहाण केल्याची बाब नाकारली आहे. तक्रारीतील त्याला आरोपीनी मारहाण केली हा मजकुर चुकीचा आहे असे तो सांगतो. आरोपीचा मोबाईलद्वारे फोटो काढला ही बाब देखील त्याने नाकारली आहे. आरोपीने त्याला काठीने मानेवर मारहाण केली

व पोटात लाथा मारल्या ही बाब तो नाकारतो. तसेच सा.क्र.४ सुदेशना विलास चौधरी (निशाणी २६) हिने दिनांक १८.०६.२०२२ रोजी ती किणी यल्लादेवी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात शासकीय कामाकरीता गेली असताना त्याठिकाणी भाउसाहेब कांबळे हा हजर होता असे सांगितले आहे. दुपारी ०१.०० वा. आरोपी तेथे आला व त्याने कृत्रिम रेतनबद्यल विचारले व फिर्यादीने त्याला माहिती दिली असे ती सांगते. आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये बाचाबाची झाली असे ती सांगते. आरोपीने फिर्यादीला काठीने मानेवर मारले व पोटात लाथा मारल्या ही बाब ती नाकारते.

१३. उपरोक्त पुराव्यावरुन असे दिसुन येते की, फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभियोग पक्षास साहय करत नाहीत. आरोपीने फिर्यादीला काठीने मारल्याची बाब ते नाकारतात. आरोपीने त्याला ठार मारण्याची धमकी दिली असे ते सांगत नाहीत. काय शिवीगाळ केली हे ते सांगत नाहीत. सबब घडलेल्या गुन्हयाबाबत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व जखमी हे सांगत नसल्यामुळे आरोपीने फिर्यादीचे सरकारी कामात अडथळा आणला, त्याला मारहाण केली व धमकी दिली या बाबी सांगणारा सरळ तोंडी पुरावा नाही.

१४. सा.क्र.६ मुरारी किशनराव गायकवाड (निशाणी ३६) याने असे सांगितले आहे की, आरोपीने दिनांक २०.०६.२०२२ रोजी त्याच्याकडे निवेदन दिले व काठी काढुन देण्याचे कबुल केले. त्याप्रमाणे त्याने सा.क्र.५ श्रीकांत उत्तम माने (निशाणी ३१) याच्या समक्ष निवेदन पंचनामा तयार केला. त्यानंतर आरोपीच्या घरी जावुन त्याच्या घराशेजारी भिंतीच्या कडेला असलेली काठी पंचनाम्याने जप्त केली. तसेच फिर्यादीचे शर्ट जप्त केले. निवेदन व जप्ती पंचनामा (निशाणी पी–३३/सा.क्र.५ व पी–३४/सा.क्र.५) वर असुन शर्ट जप्ती पंचनामा (निशाणी पी–३५/सा.क्र.५) वर आहे. त्यानी काठी व शर्ट ओळखले आहे. उपरोक्त पंच सा.क्र.५ श्रीकांत उत्तम माने (निशाणी ३१) याने देखील तसा जबाब

दिला आहे. परंतु त्याने आरोपीचे शर्ट जप्त केल्याचे सांगितले आहे. त्याच प्रकारचा जबाब सा.क्र.१ पोलीस कॉन्सटेबल गौसमिया शादुल शेख (निशाणी १७) याने दिलेला आहे.

१५. वैद्यकीय अधिकारी सा.क्र.२ डॉ.हरेश्वर प्रल्हाद सुळे यानी दिनांक १८.०७.२०२२ रोजी फिर्यादीस प्राथमिक आरोग्य केंद्र वाढवणा येथे तपासले व त्याच्या अंगावर, मानेवर आडवा ओरखडा ज्याची लांबी रुंदी १ से.मी. X ४ से.मी. होती असा आढळल्याचा सांगितले आहे. तसेच त्याच्या डाव्या गालावर दोन बोटांचे वळ ज्याची लांबी रुंदी ३ से.मी. X १ से.मी. होती असा आढळुन आला असे सांगितले आहे. त्याने निशाणी पी–२०/सा.क्र.२ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र दिल्याचे सांगितले आहे.

१६. मुळ जखमी फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यानी अभियोग पक्षास मदत केली नसल्याने व आरोपीने मारहाण केली नसल्याचे सांगितल्याने उपरोक्त इतर पुरावा हा केवळ तांत्रिक पुरावा असल्याने अभियोग पक्षास उपयोगी पडणारा नाही. तोंडी पुरावा हा सर्वात चांगला पुरावा असल्याने इतर परिस्थितीजन्य पुरावा हा सरळ पुराव्याला मात देवु शकत नाही. त्यामुळे आरोपीनी फिर्यादीस काठीने मारहाण केली व पोटात लाथा मारल्या व त्याच्या सरकारी कामात अडथळा आणला व त्याला धमकी दिली हे शाबीत होत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी आहेत.

**<u>मुद्दा क्र.४ करीता</u>**–

१७. मुद्दे क्र.१ ते ३ बाबतचे माझे निष्कर्ष पाहता अभियोग पक्षाला आरोपी विरूध्द ठेवण्यात आलेला दोषारोप शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. परिणामतः आरोपीला दोषमुक्त करणे योग्य होणार आहे. या कामातील जप्त मुद्देमाल काठी व कपडे हे अपिल कालावधीनंतर नष्ट करणे योग्य होणार आहे.

तसेच, आरोपी कडून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे आरोपीने रक्कम रूपये २५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका गरज पडल्यास मा.वरिष्ठ अपिल न्यायालयात हजर राहण्याकरीता द्यावा असा आदेश करणे योग्य होणारे आहे. त्यामुळे याकामी मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी पुंडलिक विश्वनाथ बिरादार यास भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ३५४, ३३२, ५०६ अन्वये दंडनिय अपराध केल्याच्या आरोपांतून दोषमुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | जप्त मुद्देमाल काठी व कपडे हे अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावीत. |
| ४. | आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे रक्कम रूपये २५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका गरज पडल्यास मा.वरिष्ठ अपिल न्यायालयात हजर राहण्याकरीता द्यावयाचा आहे व तो सहा महिन्यांसाठी अस्तित्वात राहील. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DIPAK BABALI MHALATKAR
Date: 2026.03.16 16:32:03 +0530

( डि.बी.म्हालटकर )

दिनांक १३.०३.२०२६ अतिरीक्त सत्र न्यायाधीश, उदगीर, जि. लातूर.

**भागः–ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १८/०६/२०२२ |
| प्रथम खबर दिनांक | : | १८/०६/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्राचा दिनांक | : | ०४/०८/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | : | ०१/११/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | : | २२/१२/२०२५ |
| न्यायनिर्णय आरक्षित केल्याचा दिनांक | : | १२/०३/२०२६ |
| निकाल दिल्याचा दिनांक | : | १३/०३/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | : | -- |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन दिल्याचा दिनांक | दोषारोप निश्चित केल्याचे कलम | शिक्षा किंवा दोषमुक्त | शिक्षा | संपरीक्षेदरम्यान आरोपी कोठडीत असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुंडलिक विश्वनाथ बिरादार | १८.०६.२०२२ | ०६.०७.२०२२ | भारतीय दंड संहितेचे कलम ३५३, ३३२, ५०६. | दोषमुक्त | -- | ०० वर्ष ०० महिने १८ दिवस |

## <u>भाग क</u>

## [परिच्छेद ४४ (III) चे प्रकरण ६ फौजदारी नियमावली]

### अ. अभियोग पक्ष

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | गौसमियाँ शादुल शेख | लॉकअप गार्ड |
| सा.क्र.२ | डॉ.हरेश्वर प्रल्हाद सुळे | वैद्यकीय अधिकारी |
| सा.क्र.३ | भाऊसाहेब दगडु कांबळे | वर्दीदार |
| सा.क्र.४ | सुदेशना विलास चौधरी | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र.५ | श्रीकांत उत्तम माने | पंच साक्षीदार |
| सा.क्र.६ | मुरारी किशनराव गायकवाड | तपासी अधिकारी |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असल्यास**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशाणी क्रमांक.**

**अ. अभियोग पक्ष**

| अ. क्र | निशाणी क्रमांक | विवरण | कागदपत्र शाबित करणारा साक्षीदार |
|---|---|---|---|
| १ | पी–२०/सा.क्र.२ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र | सा.क्र.२ डॉ.हरेश्वर सुळे |
| २ | पी–२०/सा.क्र.२ | वैद्यकीय अधिकारी यानी पोलीसाना दिलेले पत्र | सा.क्र.२ डॉ.हरेश्वर सुळे |
| ३ | पी–२३/सा.क्र.३ | फिर्यादीवरील वर्दिदार याची सही | सा.क्र.३ भाउसाहेब कांबळे |
| ४ | पी–२४/सा.क्र.३ | शर्ट जप्ती पंचनाम्यावरील वर्दिदार याची सही | सा.क्र.३ भाउसाहेब कांबळे |
| ५ | पी–२५/सा.क्र.३ | फोटोग्राफ व ६५–ब चे प्रमाणपत्र | सा.क्र.३ भाउसाहेब दगडु कांबळे |
| ६ | पी–३२/सा.क्र.५ | घटनास्थळ पंचनामा | सा.क्र.५ श्रीकांत उत्तम माने |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | पी–३३/सा.क्र.५ | निवेदन पंचनामा | सा.क्र.५ श्रीकांत उत्तम माने |
| ८ | पी–३४/सा.क्र.५ | काठी जप्ती पंचनामा | सा.क्र.५ श्रीकांत उत्तम माने |
| ९ | पी–३५/सा.क्र.५ | शर्ट जप्ती पंचनामा | सा.क्र.५ श्रीकांत उत्तम माने |
| १० | पी–३७/सा.क्र.६ | अटक पंचनामा | सा.क्र.६ मुरारी किशनराव गायकवाड |
| ११ | पी–३८/सा.क्र.६ | पंच मिळणेकरीता उपअधिक्षक, भुमिअभिलेख यांना दिलेले पत्र दिनांक २०.०६.२०२२ | सा.क्र.६ मुरारी किशनराव गायकवाड |
| १२ | पी–३९/सा.क्र.६ | पशुवैद्यकीय दवाखानाचा ८–अ उतारा | सा.क्र.६ मुरारी किशनराव गायकवाड |

**ब. बचाव पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालयीन निशाणी क्रमांक.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**ड. भौतिक वस्तू**

| अ. क्र. | भौतिक वस्तू | विवरण | ओळखणा–या साक्षीदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १. | मटेरियल ऑब्जेक्ट क्र.१ | काठी | सा.क्र.५ श्रीकांत उत्तम माने |
| २ | मटेरियल ऑब्जेक्ट क्र.२ | आरोपीचा शर्ट | सा.क्र.५ श्रीकांत उत्तम माने |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DIPAK BABALI MHALATKAR
Date: 2026.03.16 16:32:16 +0530

( डि.बी.म्हालटकर )

दिनांक १३.०३.२०२६ अतिरीक्त सत्र न्यायाधीश, उदगीर, जि. लातूर.

*******